# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:08.12.2025** **वार:सोमवार**

1. राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन आजपासून नागपूरमध्ये
2. राज्य कुठल्याही प्रकारे दिवाळखोरीकडे चाललेलं नाही-मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
3. देशांतर्गत विमान वाहतूकीबाबत विमान वाहतूक मंत्रालयाचे निर्देश जारी आणि
4. महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीच्या दर्पण पुरस्कारांची घोषणा

**हिवाळी अधिवेशन-मुख्यमंत्री-नागपूर**

राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन आजपासून नागपूर इथं सुरू होत आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला काल राज्य सरकारतर्फे पत्रकार परिषद घेण्यात आली. राज्य कुठल्याही प्रकारे दिवाळखोरीकडे चाललेलं नाही असं ठाम प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पत्रकार परिषदेत केलं. राज्यातल्या सर्व लोककल्याणकारी योजना पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारकडे निधी उपलब्ध असल्याचं त्यांनी सांगितलं. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाही, या विरोधकांच्या आरोपाला उत्तर देताना ते म्हणाले......

**योजना हाती घेतलेल्या आहेत त्या योजना पूर्ण करण्याकरता पैसे आमच्याकडे आहेत, ते आम्ही देतो दुसरं शेतकऱ्यांच्या संदर्भातही त्यांनी सांगितलं त्यामुळे जवळपास ब्याण्णव टक्के शेतकऱ्यांना जे काही पूरबाधित शेतकरी होते, आणि ही संख्या नव्वद लाखाच्या वर आहे ब्याण्णव टक्के शेतकऱ्यांना मदत मिळालेली आहे. आठ टक्के जे शेतकरी आहेत ते केवायसीचा त्यांचा प्रश्न आम्ही सोडवतो केवायसी चा प्रश्न असलेले जवळपास बारा शेतकरी होते, त्यातल्या अर्ध्यापेक्षा जास्त शेतकऱ्यांचा प्रश्न आतापर्यंत आपण सोडवलेला आहे, आणि उर्वरितही सोडवणं चाललंय ते सोडवल्याबरोबर त्यांना आपण ते पैसे देणार आहोत. त्यामुळे हे म्हणणं की शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही अभ्यास न करता केलेलं अशा प्रकारचं हे विधान या ठिकाणी आहे आणि आपण जी पावसाची मदत म्हटली होती ती पण गेलेली आहे. आणि दहा हजार रुपयांची मदत आपण एक काही वेगळी देण्याचा निर्णय केला होता तीही पण मदत आपण या ठिकाणी पूर्णपणे दिलेली आहे.**

आचारसंहितेमुळे या अधिवेशनाचा कालावधी अल्प असला तरी शनिवार रविवारी कामकाज चालणार आहे. विरोधी पक्षनेतेपदा संदर्भात विधानसभेचे अध्यक्ष आणि विधान परिषदेचे सभापती जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल असं मुख्यमंत्री म्हणाले.

**विरोधीपक्ष पत्रकार परिषद-नागपूर**

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर काल विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीच्या नेत्यांनी पत्रकार परिषद घेतली. विरोधी पक्षनेतेपद, हिवाळी अधिवेशनाचा कमी कालावधी, शेतकरी आत्महत्या इत्यादी मुद्द्यांवरुन काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अनिल देशमुख यांनी सत्ताधाऱ्यांवर यावेळी टीका केली.

**नागरी हवाई वाहतूक निर्देश**

देशांतर्गत विमान वाहतूक सेवा पूर्ण क्षमतेने, सुरळीतपणे सुरू असल्याचं आणि इंडिगोच्या कामगिरीतही सुधारणा होत असल्याचं काल नागरी विमान वाहतूक मंत्रालयातर्फे सांगण्यात आलं. विमान प्रवासाच्या वाढत्या किंमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी कमाल प्रवासभाड्याची मर्यादा ठरवण्यात आली असून त्याची तत्काळ प्रभावानं अंमलबजावणी केली जाणार आहे. रद्द झालेल्या अथवा वारंवार विलंब झालेल्या विमानांच्या प्रवासभाड्याची रक्कम परत देण्याचे आणि प्रवाशांच्या हरवलेल्या सामानाचा शोध घेऊन ते 24 तासांत त्यांना परत देण्याचे आदेश इंडिगो कंपनीला देण्यात आले आहेत. तसंच प्रवासभाड्याबाबतच्या नवीन नियमावलीचं काटेकोर पालन करण्याच्या सूचनाही मंत्रालयानं सर्व विमान कंपन्यांना दिल्या आहेत. दरम्यान इंडिगो कंपनीच्या विमान सेवेतील विस्कळीतपणाची कारणं सांगताना विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले.....

**अहमदाबाद दुर्घटनेच्या नंतर पायलट असोसिएशनने ही मागणी केली होती की दहा तासाचा आमचा जो ड्युटी जो टाईम आहे, तो कमी केला जावा तो आठ तासाचा केला जावा म्हणून दिल्ली उच्च न्यायालयानं तसे निर्देश पण दिले, आणि मग ताबडतोब डीजीसीएनं सर्व विमान कंपन्यांना तसे निर्देशही दिले एक जुलै दोन हजार पंचवीस व एक नोव्हेंबर दोन हजार पंचवीस अशा दोन टप्प्यामध्ये प्रत्येक विमान कंपनीनं जे नियम आता दिले आहेत. त्यानुसार ताबडतोब आपल्या व्यवस्थापनामध्ये बदल करावेत परंतु इंडिगोने मात्र अगदी शेवटपर्यंत दोन चार दिवसांपर्यंत सुद्धा त्याच्यावरती कुठलं काम केलं नाही आणि म्हणून दहा तासाचा कामाचा अवधी आठ तासावर आला आज पासष्ठ टक्के विमानसेवा डोमेस्टिकमध्ये इंडिगो देशाला आणि म्हणून एक तर अगोदरचं पायलटचं आणि क्रुच असलेलं संख्याबळातली कमतरता आणि दोन तास कमी झाल्यामुळे त्याच्यामध्ये अधिक कमतरता मनुष्यबळाची निर्माण झाली आणि म्हणून मागच्या एक नोव्हेंबरपासून चार दिवसांपूर्वी या मधल्या काळामध्ये हळू हळू हळू हा सगळा ताण त्या व्यवस्थेवरती वाढला आणि पूर्ण यंत्रणा कोलॅप्स झाल्याचं आपण सगळ्यांनी पाहिलं.**

**दर्पण पुरस्कार**

महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीच्या दर्पण पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. पुण्याचे ज्येष्ठ पत्रकार राजीव साबडे यांना यंदाचा विशेष दर्पण पुरस्कार जाहीर झाला आहे. शंतनु डोईफोडे, बसवेश्वर चेणगे, जीवनधर चव्हाण, प्रकाश कुलथे, श्रीराम जोशी, विजय पालकर, डॉक्टर अनिल काळबांडे आणि आशीष कदम यांचाही पुरस्कार जाहीर झालेल्या पत्रकारांमध्ये समावेश आहे. राज्यातील माहिती आणि जनसंपर्क विभागातील प्रभावी वृत्तांकनासाठीचा पहिला 'दर्पण' पुरस्कार पुणे जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांना देण्यात येणार आहे.

**ध्वजनिधी संकलन-सोलापूर**

ध्वजनिधी संकलनात पुणे महसूल विभागात सोलापूर जिल्ह्यानं सर्वोच्च कामगिरी केली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांचामुंबईत होणाऱ्याराज्यस्तरीय ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रमात राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

**संविधान परिषद- रत्नागिरी**

रत्नागिरी इथं काल संविधान जागर विचार मंचातर्फे राष्ट्रीय संविधान परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अभय ठिपसे, डॉ. नरेंद्र जाधव यांनी मार्गदर्शन केलं. संवैधानिक मूल्यांचा प्रचार आणि प्रसाराचं काम करणाऱ्या प्रा. डॉ. गुलाबराव राजे यांना या परिषदेत पहिला राष्ट्रीय संविधान सन्मान पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

**पुणे विद्यापीठ-भूगोल विभाग**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भूगोल विभागाचा अमृत महोत्सव काल उत्साहात साजरा झाला. विज्ञान मंत्रालयाच्या फोसी जीआयएस विभागाचे राष्ट्रीय समन्वयक मोहम्मद कासिम खान यांनी या कार्यक्रमात विद्यापीठाच्या भूगोल विभागाला मोठा सन्मान जाहीर केला. भूगोल विभागाची 'ओपन-सोर्स जिओस्पेशियल नॉलेज पार्टनर' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसंच फोसी GIS प्रकल्पातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुणे विद्यापीठाला 'सर्वोत्तम विद्यापीठ पुरस्कार' प्रदान करण्यात आल्याचं खान यांनी सांगितलं. राज्याच्या सहकार आणि पणन विभागाचे माजी सचिव शिवाजीराव देशमुख, कुलगुरु प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र कुलगुरु प्रा. डॉ. पराग काळकर आणि देशभरातून आलेले सुमारे 350 आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या सोहळ्यासाठी उपस्थित होते.

**निधन**

पुण्यातील ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कार्यकर्ते आणि ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे पहिले प्राचार्य यशवंतराव लेले यांचं काल निधन झालं. ते 94 वर्षांचे होते. आज सकाळी साडेअकरानंतर त्यांच्या पार्थिवावर वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. तत्पूर्वी दहा ते अकरा या वेळेत ज्ञानप्रबोधिनी प्रशालेत त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे.

**अपघात- नाशिक**

नाशिक जिल्ह्यात वणी इथल्या सप्तश्रृंगी देवी गडाजवळ मोटार दरीत कोसळून सहा जण ठार झाले आहेत. काल संध्याकाळी हा अपघात घडला. गडाच्या संरक्षक कठड्याची भिंत तोडून ही मोटार सुमारे हजार फूट खाली खोल दरीत कोसळली. अपघातातील सर्व मृत व्यक्ती नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत गावातील आहेत.

**पुणे मॅरेथॉन**

39 व्या पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत पूर्ण मॅरेथॉनमध्ये पुरुष गटात इथिओपियाच्या हैमोनत अगेग्न्हु याने विजेतेपद पटकावलं तर महिलांच्या पूर्ण मॅरेथॉनमध्ये चिपळूणची साक्षी जड्याळ विजेती ठरली. स्पर्धेतील यशानंतर आपलं मनोगत व्यक्त करताना साक्षी म्हणाली.....

**आज मी बेचाळीस किलोमीटरला ओवरऑल फर्स्ट केली गेल्या वर्षी मी एकवीस किलोमीटरला पण ओवरऑल फर्स्ट केली होती मला पुण्याचा रूट वगैरे खूप छान वाटला तर मी सातारमध्ये प्रॅक्टिस करते मी लॉग रन वगैरे करायची मी पस्तीस छत्तीस किलोमीटर वगैरे त्यासाठी मी मे महिन्यापासून मी बेचाळीस किलोमीटरची प्रॅक्टिस सुरू केली.**

अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत पुरुष गटात भारताच्या सचिन यादवनं तर महिला गटात भारती सिंगनं प्रथम क्रमांक मिळवला. दहा किलोमीटरच्या स्पर्धेत अभिषेक देवका आणि पाच किलोमीरच्या स्पर्धेत सुहास सावरतकर विजेते ठरले. व्हील चेअर प्रकारात सोमनाथ जाधव यांनी प्रथम क्रमांक मिळवला.

**हवामान**

येत्या दोन दिवसात विदर्भात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.